महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ११

# महाराजा सयाजीराव आणि गंगारामभाऊ म्हस्के

दिनेश पाटील



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ११

# महाराजा सयाजीराव आणि गंगारामभाऊ म्हस्के

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि गंगारामभाऊ म्हस्के
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - ३१
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
प्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५० रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे ‘बौद्धिक नेतृत्व’च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे ‘महानायक’ सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा ‘उदोउदो’ करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील ‘विसंवाद’ कमी करून ‘सुसंवाद’ वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास ‘जोडून’ वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# गंगारामभाऊ म्हस्के

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात महात्मा फुल्यांचे एक सहकारी आणि सत्यशोधक चळवळीचे हितचिंतक आणि पाठीराखे गंगारामभाऊ म्हस्के यांनी मराठा जातीतील शिक्षण प्रसाराच्या चळवळीचा पाया घातला. महात्मा फुल्यांनी शूद्रातीशूद्र आणि स्त्रिया यांच्या शिक्षणाचा आग्रह धराला. याचवेळी सयाजीराव गायकवाडांनी आपल्या बडोदा संस्थानात फुल्यांना अपेक्षित कामाची उभारणी फुले संकल्पित धोरणाच्या पुढे जाऊन केली. महत्त्वाचे म्हणजे सयाजीरावांनी आपली मातृभूमी असणाऱ्या महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला सर्वाधिक योगदान दिले. त्याचप्रमाणे मराठ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी १५० कोटींहून अधिक रक्कम खर्च केली. गंगारामभाऊंच्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनला स्थापनेपासून पुढे सलग ५४ वर्षे आर्थिक पाठबळ दिले. फक्त महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या गरीब मराठ्यांना शिष्यवृत्ती देऊन एक ऐतिहासिक काम उभे

केले. म्हणूनच सीताराम तावडे म्हणतात, '१८८९ सालापर्यंत या संस्थेला दोनतीन मराठा विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यापलीकडे विशेष भरीव कामगिरी करता आली नाही परंतु पुढे श्री सयाजीराव महाराज गायकवाड यांनी दर साल २४०० रुपये देण्याचा उपक्रम केल्यानंतर डे. मराठा असोसिएशनचें कार्यक्षेत्र वाढले.'

मराठा जात ही महाराष्ट्रातील लोकसंख्येने सर्वात मोठा समुदाय आहे. परंतु त्यातील बहुसंख्य लोक अज्ञान आणि दारिद्र्य यांनी ग्रासलेले होते. अगदी शिवाजी महाराजांच्या काळापासूनचा इतिहास पाहिला असता आर्थिकदृष्ट्या हा समुदाय सतत संकटात होता. ब्रिटिश भारतात जरी आधुनिक शिक्षण उपलब्ध झाले तरी खालावलेली आर्थिक स्थिती आणि या नव्या शिक्षणाचे महत्त्व या समुदायाच्या फार उशिरा लक्षात आल्यामुळे त्याचा लाभ उठविण्याची दृष्टी मराठ्यांमध्ये नव्हती. या पार्श्वभूमीवर मराठ्यांमध्ये एकूणच शिक्षण आणि मुख्यत: उच्च शिक्षण रुजवण्याचे क्रांतिकारक काम गंगारामभाऊंनी सयाजीरावांच्या पाठबळाने उभे केले. यासंदर्भात १८९४ च्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या वार्षिक अहवालात गंगारामभाऊंनी यासंदर्भात आपली कळकळ व्यक्त करताना म्हटले होते, 'डेक्कनमध्ये मराठ्यांची लोकसंख्या एकंदर लोकसंख्येच्या शे.५० पेक्षा जास्त आहे. म्हणून जोपर्यंत ही मराठा जात विद्येत इतर पुढारलेल्या जातींबरोबर आली नाही, तोपर्यंत आपली खरी राष्ट्रीय उन्नती झाली, असे कधीच म्हणता यावयाचे

नाही.' गंगारामभाऊंच्या या विधानातून एक महत्त्वाची बाब स्पष्ट होते ती अशी की, मराठा जातीच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी उभे केलेले हे काम संकुचित जाती अभिमानातून हाती घेतले नव्हते तर एक राष्ट्रीय प्रश्न म्हणून व्यापक राष्ट्रीय उन्नतीच्या भूमिकेतून ते मराठ्यांच्या उत्कर्षाचा विचार करत होते.

आज जेव्हा आपण गंगारामभाऊंच्या कामाचा विचार करतो तेव्हा त्यांचे ऐतिहासिक महत्त्व जास्त प्रकर्षाने जाणवते. कारण आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि मराठा जातीची विस्कटलेली आर्थिक घडी हा एक गंभीर प्रश्न म्हणून पुढे येत आहे. मराठा आरक्षणाचा गेली अनेक वर्षे सुरू असलेला संघर्ष आणि लाखोंच्या संख्येने प्रत्येक जिल्ह्यात निघालेले मोर्चे हे गंगारामभाऊंनी १३५ वर्षांपूर्वी हे काम का हाती घेतले होते याची प्रचिती देतात. गंगारामभाऊ २९ एप्रिल १९०१ ला विषमज्वराने मृत्यू पावले. डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन ही संस्था त्यांनी १८८३ ला सुरू केली. म्हणजे जेमतेम साडेसतरा वर्षे त्यांना हे काम करता आले. त्यांच्या मृत्यूनंतरही जवळजवळ ४० वर्षे सयाजीरावांनी या संस्थेला भक्कम आणि सर्वाधिक आर्थिक पाठबळ दिले. त्याचप्रमाणे इतर मराठा संस्थानिकांनीही आपल्या कुवतीनुसार या कामाला आर्थिक साहाय्य केले. यातून मराठ्यांच्या शैक्षणिक उन्नतीची चळवळ उभी राहिली. परंतु आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाने या क्रांतिकारक चळवळीची नोंद घेतली नाही. परिणामी त्यातून बोध घेण्याचा प्रश्नच उद्भवत

नाही. म्हणूनच मराठे जोपर्यंत गंगारामभाऊ आणि सयाजीराव यांची त्यांच्या उन्नतीतील भूमिका समजून घेणार नाहीत तोपर्यंत त्यांना  त्यांच्या उत्कर्षाचा 'विकासबिंदू' गाठता येणार नाही.

## मराठ्यांसाठी पायाभूत कार्य

डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सव ग्रंथाचे संपादक सीताराम तावडे यांनी त्या काळातील बहुजन जातीतील जातीनिहाय सामाजिक काम करणाऱ्या संस्थांची पार्श्वभूमी स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणे बहुजन जातीतील अशा सेवाभावी संस्थांना सत्यशोधक चळवळीची पार्श्वभूमी कशी होती हेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे या पार्श्वभूमीवर गंगारामभाऊंचे काम विचारात घेतले तर शीर्षकात त्यांना 'मराठ्यांचे महानायक' का म्हटले आहे हे स्पष्ट होईल. तसेच यात जाती अभिमान किंवा जातीय संकुचितपणा नसून त्यांच्या कामाचे वास्तव मूल्यमापन आहे याची प्रचिती येईल. या ग्रंथात तावडे म्हणतात, 'याच वेळी पुण्यात पुढारलेल्या वर्गातील काही पदवीधरांनी न्यू इंग्लिश स्कूल, नेटिव्ह इन्स्टिट्यूट व नूतन मराठी विद्यालय अशा खाजगी संस्था स्थापन केल्या. केसरी, मराठा वगैरे वर्तमानपत्रांनी लोकजागृतीस आरंभ केला. स्वावलंबनाच्या तत्त्वावर काम करण्यास पुढारलेल्या वर्गातील काही तरुण पदवीधर पुढे आले व त्यांच्या प्रयत्नामुळे पुढारलेल्या वर्गात मोठी कर्तव्यजागृती उत्पन्न झाली. याच सुमारास कै. ज्योतीराव फुले, कै. रा. ब. लोखंडे, कै. भाऊ पाटील डुंबरे, कै. कृष्णराव पांडुरंग भालेकर,

कै. गंगारामभाऊ म्हस्के वकील यांनी मागासलेल्या वर्गात कर्तव्यजागृतीस आरंभ केला. पुणे व मुंबई येथे सत्यशोधक समाज व दीनबंधू, सार्वजनिक सभा अशा संस्था स्थापन करण्यात आल्या. दीनबंधू शेतकऱ्यांचा कैवारी, दीनमित्र, अंबालहरी, बडोदावत्सल वैगेरे पत्रांनी मागासलेल्यांविषयी लेख लिहून शिक्षणविषयक जागृती उत्पन्न केली. मागासलेल्या वर्गामध्ये आपापल्या समाजात शिक्षणप्रसार करण्यासाठी निरनिराळ्या लहान लहान संस्था स्थापन होऊ लागल्या. मागासलेला समाज फार मोठा असल्यामुळे श्रमविभागाच्या तत्त्वावर लहान लहान संस्था असणे अपरिहार्य होते.'

म्हस्केंचा जन्म हा नाशिक जिल्ह्यातला. म्हणजेच सयाजीराव व म्हस्के हे दोघेही नाशिक जिल्ह्याचे भूमिपुत्र होते. त्यांचे वडील पुण्यात हमालीचे काम करत होते. त्यांचे शिक्षण पुण्यातील मिशन शाळेत झाले. शिक्षण झाल्यावर छोट्यामोठ्या नोकऱ्या केल्या. पुणे कॅंटोन्मेंट मॅजिस्ट्रेटचे शिरस्तेदार म्हणून त्यांना नोकरी मिळाली. याच दरम्यान त्यांनी वकिलीचे शिक्षण घेतले. १८७५ ला त्यांनी पुण्यात वकिली सुरू केली. वकिलीच्या व्यवसायात मोठा लौकिक आणि चांगला पैसा त्यांनी मिळवला. १८७३ मध्ये फुल्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे ते स्थापनेपासूनच सदस्य आणि हितचिंतक होते. न्यायमूर्ती रानडे आणि गंगारामभाऊ यांची मैत्री होती. डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेवेळी रानडे आणि सत्यशोधक राजन्ना

लिंगू ही प्रमुख मंडळी त्यांच्याबरोबर होती. १८८१ च्या जनगणना अहवालात मराठा जात शैक्षणिक क्षेत्रात अतिशय मागास असल्याचे त्यांना आढळले. म्हणूनच त्यांनी सर डब्ल्यू. वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली मराठा जातीच्या शैक्षणिक प्रगतीबाबत चर्चा करण्यासाठी सभा भरवली. पुढे १८८३ ला डेक्कन मराठा एज्युकेशन संस्थेची स्थापना झाली. स्थापनेपासूनच सयाजीरावांनी या संस्थेला २,४०० रु.चे वर्षासन दिले होते. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनीही पुढे या संस्थेस आर्थिक साहाय्य केले होते.

गंगारामभाऊ म्हस्के हा आधुनिक महाराष्ट्रातील पूर्णतः अज्ञात महानायक आहे. माझे हे विधान महाराष्ट्रातील इतिहास संशोधक, चळवळीतील बुद्धिजीवी आणि शिक्षित वर्गाला चक्रावून सोडेल. परंतु आजच्या मराठा आरक्षण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मराठ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वाधिक योगदान देणाऱ्या गंगारामभाऊंचे पुनर्वाचन हे मराठ्यांबरोबर बुद्धिजीवींसाठी अनिवार्य आहे. गंगारामभाऊ हे सत्यशोधक समाजाचे सदस्य आणि हितचिंतक होते. म्हस्केंनी पुण्यामध्ये मराठा जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याच्या उद्देशाने १८८३ मध्ये डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन ही संस्था स्थापन केली. यासंदर्भात तावडे म्हणतात, 'मराठा जातीत विद्येचा प्रसार न होण्यास त्यांची अनास्था व दारिद्र्य ही मुख्य होत, या अडचणी कै. म्हस्के यांच्या

पूर्ण लक्षात येऊन त्यांनी १८८३ सालापासून हुशार व होतकरू मराठा विद्यार्थ्यांस स्कॉलरशिपरुपाने द्रव्यसाह्य करण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांनी अविश्रांत श्रम करून आपल्या काही मित्रमंडळींच्या व इतर समाजातील थोर मंडळींच्या साहाय्याने व सहानुभूतीने डेक्कन असोसिएशन ही संस्था स्थापन केली. याच वेळी मे. ली-वॉर्नरसाहेब, कै. रानडे व इतर समतावादी मंडळींचे या संस्थेस पूर्ण साह्य मिळाले. या संस्थेचा नामकरणविधी ता. ८ जानेवारी १८८३ मध्ये पुणे येथील हिराबागेतील टाऊन हॉलात सर वुल्यम वेडरबर्न यांचे अध्यक्षतेखाली झाला.' मराठ्यांच्या शैक्षणिक उन्नतीचा विकास तपासला असता जवळ-जवळ सर्व ज्ञानशाखांतील मराठ्यांमधील पदवीधरांची पहिली पिढी गंगारामभाऊंच्या शिष्यवृत्तीवर शिकलेली होती. इतकेच नव्हे तर बडोदा, ग्वाल्हेर, इंदोर, कोल्हापूर या महत्त्वाच्या संस्थानांमधील प्रशासनात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळणारे बहुतेक उच्चशिक्षित मराठे हे गंगारामभाऊंचे बौद्धिक 'उत्पादन' होते.

याचे उत्तम उदाहरण म्हणून आपल्याला कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या संस्थानचा विचार करावा लागेल. शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणाला कृतीत उतरविणाऱ्या काही व्यक्तींचा या दृष्टीने विचार करता येईल. यामध्ये भास्करराव जाधव हे एक महत्त्वाचे नाव. भास्करराव जाधवांना १८८८ ते १८९२ अशी पाच वर्षे गंगारामभाऊंची शिष्यवृत्ती होती. या काळात ते मुंबई

विद्यापीठातून पदवीधर झाले. त्यांनी कोल्हापुरात सत्यशोधक चळवळ रुजवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली. १८९८ ते १९२१ अशी २३ वर्षे त्यांनी कोल्हापुरातील सर्व पुरोगामी चळवळींना बौद्धिक नेतृत्त्व दिले. कोल्हापूर संस्थानातील पहिले मराठा वकील खंडेराव बागल हे डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या शिष्यवृत्तीवर शिकले होते. शाहू महाराजांनी त्यांना न्यायाधीशपदी नेमले होते. शाहू महाराजांनी १९०१ मध्ये सुरू केलेल्या मराठा बोर्डिंग या पहिल्या वसतिगृहाचे पहिले विद्यार्थी पी.सी.पाटील, मराठा जातीतील पहिले इंजिनिअर दाजीराव अमृतराव विचारे हे कोल्हापूर संस्थानात एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर होते. शाहू महाराजांच्या मराठा बोर्डिंगच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळणारे जिवाजीराव सावंत, शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या क्षात्रजगद्गुरूपीठाचे पहिले जगद्गुरू सदाशिवराव पाटील बेनाडीकर, शाहू महाराजांच्या पहिल्या वसतिगृहाचे पहिले विद्यार्थी पी. सी. पाटील, कोल्हापूर संस्थानातील पहिले मराठा न्यायाधीश खंडेराव बागल हेसुद्धा डेक्कन मराठाच्या शिष्यवृत्तीवर शिकलेले होते. महत्त्वाचे म्हणजे या सर्व लोकांनी फक्त मराठा जातीसाठी नाही तर सर्व बहुजनांच्या कल्याणाचे काम केले. या उदाहरणावरून गंगारामभाऊंचे काम किती मूलभूत होते हे स्पष्ट व्हावे.

गंगारामभाऊंच्या शिष्यवृत्तीवर शिकलेल्या महाराष्ट्रातील कर्तबगार लोकांची यादी हजारात जाईल. १८८३ ते १९३५ या ५२ वर्षांत गंगारामभाऊंच्या शिष्यवृत्तीद्वारे ३३८ मराठे पदवीधर झाले. आजही ही संस्था कार्यरत आहे. तिचा पत्ता पुढीलप्रमाणे - ९९१, म्हस्के स्मारक मंदिर, हिरा बाग, लोकमान्य बाल गंगाधर टिळक रोड, सारस्वत सह. बँकेच्या वर, शुक्रवार पेठ, पुणे. बहुजनांच्या शिक्षणासाठी १८८३ पासून आजअखेर १३५ वर्षे कार्यरत महाराष्ट्रात किती संस्था आहेत? हा मुद्दासुद्धा विचार करण्यासारखा आहे. परंतु महाराष्ट्रात याबाबत पूर्ण अज्ञान असल्यामुळे म्हस्केंचे योगदान महाराष्ट्राला माहीत नाही आणि बगाडेंसारखे संशोधक गंगारामभाऊंवर अन्याय करताना दिसतात. विठ्ठल रामजी शिंदे, भास्करराव जाधव, वासुदेव लिंगोजी बिर्जे, पांडुरंग चिमाजी पाटील, रामचंद्र शामराव माने-पाटील, दाजीराव विचारे, शाहू महाराजांनी करवीरपीठाचे क्षात्रगुरू म्हणून ज्यांची नेमणूक केली ते सदाशिव पाटील बेनाडीकर, दत्तात्रय रामचंद्र भोसले, सीताराम तावडे, इतिहास संशोधक डॉ.अप्पासाहेब पवार यांसारखे शेकडो कर्तबगार लोक गंगारामभाऊंच्या शिष्यवृत्तीमुळे पुरोगामी महाराष्ट्र घडवू शकले याचे भान आपल्याला ठेवावे लागेल. या लोकांनी केलेले शैक्षणिक कार्य मराठ्यांबरोबर अस्पृश्य जातींच्या उद्धारालाही उपकारक ठरले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पन्नास

वर्षांपूर्वी सुरू झालेल्या अनेक शिक्षण संस्थांचे सूत्रधार हे गंगारामभाऊंच्या दातृत्वाचे लाभार्थी आहेत. आज महाराष्ट्रातील १४५ शिक्षणसंस्था ज्यांच्या नावात शिवाजी किंवा मराठा हे शब्द येतात त्यांचे संस्थापक गंगारामभाऊ आणि सयाजीराव यांच्या शिष्यवृत्तीवर शिकलेले आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रातील बहुजनांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता ठेवणे गरजेचे आहे.

## सयाजीराव : मराठ्यांचा आधारवड

समाज उन्नतीसाठीचे सयाजीरावांचे दातृत्व हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. भारताच्याच काय जगाच्या इतिहासात समाजविकासासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्याचे सयाजीरावांचे उदाहरण अपवादात्मक ठरावे. सयाजीरावांनी समाजातील सर्व जातीधर्मातील लोकांना त्यांच्या समाज उन्नतीसाठी आर्थिक मदत केली. ही मदत करत असताना त्यांनी कोणाचा जात-धर्म पाहिला नाही. एकूण समाजव्यवस्थेत संबंधित समुदायाचे मागासलेपण पाहून त्यांच्या त्यांच्या गरजेनुसार महाराजांनी त्यांना मदत केली. मराठा जातीबाबतही महाराजांचे हेच धोरण होते. स्वजातीचा विकास एवढा कोता विचार महाराजांनी केला नाही. मराठा जातीसाठी काम करणाऱ्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन व अखिल मराठा शिक्षण परिषद या दोन संस्थांना सयाजीरावांनी आर्थिक पाठबळ दिले नसते तर या संस्थांना त्यांनी जे कार्य केले ते एवढे व्यापक

स्वरूपात करता आले नसते. हे या दोन संस्थांना महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीवरून स्पष्ट होते. म्हणूनच सयाजीराव महाराज हे मराठ्यांच्या शैक्षणिक उन्नतीचे आधारवड होते.

ज्याप्रमाणे विठ्ठल रामजी शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामाची पार्श्वभूमी तयार केली त्याचप्रमाणे गंगारामभाऊंनी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कामासाठी जमीन नांगरून ठेवली. लोकसंख्येत तसेच सामाजिक आणि राजकीय नेतृत्वात आघाडीवर असणाऱ्या मराठा जातीच्या उन्नतीसाठी पायाभूत काम केलेल्या गंगारामभाऊ म्हस्केंचे नावही आज महाराष्ट्रात कुणाला माहीत नाही. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राचा 'तुटलेला' इतिहास 'जोडून' तातडीने अभ्यासण्याची गरज आहे. सयाजीराव गायकवाड यांचे या संस्थेला स्थापनेपासूनच सर्वाधिक आर्थिक साहाय्य होते. या संस्थेची स्थापना करण्याचे निश्चित झाल्याबरोबर गंगारामभाऊंनी आर्थिक साहाय्यासाठी सयाजीरावांची मदत घेण्याचे ठरवले. १८८१ ला महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला. पुढे लगेचच १८८३-८४ ला म्हस्केंनी आर्थिक मदतीसाठी सयाजीरावांची भेट घेतली असावी. यासंदर्भात सीताराम तारकुंडे म्हणतात, 'श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांची स्वारी पुणे मुक्कामी आली होती. श्रीमंताकडे रा.ब. महादेव गोविंद रानडे, रा.रा. गंगाराम म्हस्के, वकील रा.रा.राजन्ना लिंगू व आणखी दोन तीन सभ्य गृहस्थ यांचे डेप्युटेशन गेले. रा.ब.रानड्यांनी गायकवाड

सरकारास डेप्युटेशचा उद्देश सांगितला. डेप्युटेशनचा उद्देश हा होता की, मराठे लोकांची, त्यांस विद्या नसल्यामुळे किती शोचनीय स्थिती झाली आहे हे श्रीमंतास विदित आहेच. तरी मराठ्यांच्या गरीब व होतकरू मुलांस हायस्कूलचे शिक्षण मिळण्याकरिता त्यांस स्कॉलरशिप दिल्या पाहिजेत. या कामाकरिता आम्ही एक फंड काढला आहे, त्यास श्रीमंतांनी हातभार लावावा.'

सयाजीरावांनी या शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेऊन अर्थसाहाय्य सुरू केले. या संस्थेचे महाराष्ट्रासाठीचे महत्त्व ओळखून १८८५ पासून ते १९३९ पर्यंत अशी ५४ वर्षे अखंडपणे आर्थिक पाठबळ सयाजीरावांनी दिले. ही मदत ५ लाख २९ हजार ५५६ रु. इतकी होती. आजच्या रुपयाच्या दरात या रकमेचे कमीतकमी मूल्य ७२ कोटी ४५ लाखांहून अधिक होईल. मराठा जातीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी आधुनिक काळात सयाजीरावांनी जेवढे प्रयत्न केले तेवढे आजतागायत कोणीही केलेले नाहीत. यामध्ये गंगारामभाऊंची डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन हे एक प्रमुख माध्यम होते. यासंदर्भात २३ जानेवारी १८८६ ला खासेराव जाधवांना लंडनला लिहिलेल्या पत्रात सयाजीराव म्हणतात, 'आपल्या समाजाला शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून पुण्यात स्थापन झालेल्या एका मराठा संस्थेला आम्ही दरमहा दोनशे रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. आमचा हेतू पूर्ण होण्याच्या दृष्टीने ते अनुदान उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे.'

म्हणूनच भास्करराव जाधव म्हणतात, ‘पुणे येथे गंगारामभाऊ म्हस्के हे विद्वान मराठे वकिली करीत असत व ब्राह्मणेतर समाजात त्यांचे चांगले वजन होते. त्यांना सत्यशोधक तत्त्वे पटली होती. पण समाजात विद्याप्रसार होऊन खरे खोटे समजण्याची पात्रता त्यांच्या अंगी आल्याशिवाय धार्मिक बाबतीत बंड करण्याची ताकद येणार नाही, यासाठी शिक्षण प्रसाराचे-विशेषतः इंग्रजी शिक्षण प्रसाराचे काम अगोदर हाती घेतले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. आमचा समाज दरिद्री असल्याने व इंग्रजी शिक्षण बऱ्याच खर्चाचे असल्याने मुलांस स्कॉलरशिप देऊनही पैशाची ही अडचण प्रथम दूर केली पाहिजे. शिक्षण प्रसार बऱ्याच प्रमाणावर झाला म्हणजे भट्टी धार्मिक वर्चस्व आपोआप नाहीसे होईल, असे ते प्रतिपादित म्हणून त्यांनी या कामाचे महत्त्व पटलेल्या इतर गृहस्थांच्या साहाय्याने डेक्कन असोसिएशन या नावाची मंडळी सन १८८५ साली स्थापिली व फंड जमविण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज बडोदे यांना या असोसिएशनचे महत्त्व व कार्यदिशा पटली व त्यांनी २४०० रुपयांचे वर्षासन सुरू केले.’

यासंदर्भात डॉ. रमेश जाधव म्हणतात, ‘न्या. रानडे यांच्या प्रेरणेने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यासाठी ‘डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन’ निर्माण झाली होती. या संस्थेचे प्रमुख गंगारामभाऊ म्हस्के हे होते. म्हस्के यांच्या विनंतीवरूनच शाहू छत्रपतींनी या संस्थेला कोल्हापूर दरबारमार्फत ३० रुपयांचे वर्षासन मंजूर केले होते.’

## सर्वसमावेश गंगारामभाऊ

गंगारामभाऊ म्हस्के आणि सयाजीराव गायकवाड यांच्या व्यक्तिमत्त्वात समान असणारा गुण म्हणजे सर्वसमावेशकता होय. गंगारामभाऊ हाडाचे सत्यशोधक होते परंतु त्यांनी आपल्या कार्यात रानडे, गोखले, टिळक यांसारख्या पुण्यातील महत्त्वाच्या नेत्यांचा आपल्या कामात कौशल्याने उपयोग करून घेतला. बहुजनांच्या कल्याणाचा ध्यास असला तरी ते ब्राह्मणद्वेषाने पछाडलेले नव्हते. सयाजीरावसुद्धा वैचारिकदृष्ट्या सत्यशोधक बाण्याचे होते, परंतु त्यांनीसुद्धा सर्व जातीधर्मांच्या लोकांना त्यांच्या त्यांच्या गरजेनुसार पाठबळ दिले.

न्या. रानडे, गोपाळकृष्ण गोखले आणि बाळ गंगाधर टिळक हे पुण्यातील तीन महत्त्वाचे नेते गंगारामभाऊंचा वारंवार सल्ला घेत. गंगारामभाऊ म्हस्के हे किती मोठे होते हे समजण्यासाठी वरील उदाहरण पुरेसे आहे. यासंदर्भात तावडेंनी नोंदवलेले निरीक्षण बोलके आहे. ते म्हणतात, ‘कै. म्हस्के यांची योग्यता फार मोठी होती. त्या वेळच्या पुढारीवर्गांत त्यांचे वजन बरेच होते. कै. नामदार गोखले, लो. टिळक वगैरे पुढारी मंडळी त्यांचा वेळोवेळी सल्ला घेत असत. कै. म्हस्के यांनी जातीविशिष्ट संस्था स्थापन केली होती तरी त्यांनी आपल्या संस्थेविषयी इतर जातींच्या लोकांची सहानभूती कशी मिळवली होती, ते या संस्थेच्या पूर्वेतिहासावरून चांगले कळून येते.’ महाराष्ट्रातील

एक महान पण दुर्लक्षित सुधारक विठ्ठल रामजी शिंदे यांच्या फर्ग्युसन कॉलेजमधील शिक्षणासाठीसुद्धा गंगारामभाऊंच्या डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीची शिष्यवृत्ती होती. १८९३ पासून पहिली तीन वर्षे म्हस्केंची दरमहा १० रु. शिष्यवृत्ती आणि १८९६ पासून पुढे पाच वर्ष सयाजीरावांच्या दरमहा २५ रु. च्या शिष्यवृत्तीवर शिंद्यांचे शिक्षण झाले होते.

शिष्यवृती मिळवण्यासाठी शिंदे जेव्हा पहिल्यांदा म्हस्केंना भेटायला गेले तेव्हाची आठवण शिंदेंनी आपल्या आत्मचरित्रात नोंदवली आहे. शिंदे म्हणतात, 'गंगारामभाऊ म्हस्के या गृहस्थाचे मराठा जातीवर मोठे उपकार आहेत. त्या काळचे एक फरडे इंग्रजी शिकलेले, सुधारकी बाण्याचे हुशार वकील अशी त्यांची प्रसिद्धी होती. पुणे लष्करात मेन स्ट्रीटवर त्यांचे मोठे चांगले स्वतःचे घर आहे. रानडे भांडारकर वगैरेसारखी त्या काळच्या सुधारक पक्षात त्यांची चांगली मान्यता होती. वकिलीत त्यांनी बरेच पैसे मिळवले होते. हिराबागेत असलेल्या कॉस्मॉपॉलिटन क्लबच्या दिवाणखान्यात पुण्याच्या तत्कालीन मोठमोठ्या माणसांच्या मोठमोठ्या तैल-तसबिरी टांगल्या आहेत, त्यात त्यांचीही एक तसबीर अद्याप लटकत आहे. त्यांची मराठा संस्थानिक, राजे व इतर जातीचे प्रागतिक शिक्षणप्रेमी श्रीमंत गृहस्थ यांच्यामध्ये त्या काळी छाप होती.'

शिंदेंच्या मनावर पहिल्या भेटीत म्हस्केंचा पडलेला प्रभाव त्यांच्यावरील आठवणीतून व्यक्त होतो. याबरोबरच मराठा जातीवर त्यांचे असणारे उपकार याचीही कल्पना येते. पुण्यासारख्या शहरात त्याकाळात मराठा जातीतील व्यक्तीने आपला प्रभाव कसा निर्माण केला असेल आणि पहिल्या भेटीतील आकलनापेक्षा आपल्याला पुण्याची सर्व माहिती झाल्यानंतर त्यांच्या योग्यतेची कशी कल्पना आली याबद्दल शिंदे पुढे लिहितात, "त्या काळात मराठ्यांत इतका इंग्रजी शिकलेला गृहस्थ हा एकटाच होता. इतकेच नव्हे तर ते वकिलीतही बरेच पुढारलेले आणि तत्कालीन नागरिकात मान्यता पावलेले होते. हे माझ्या तेव्हा लक्षात आले नाही. कारण ही तुलना करण्याइतकी माझी पुण्याची माहिती नव्हती. ज्या म्हस्के साहेबांच्या प्रयत्नाने आज शेकडो मराठे पदवीधर झाले, त्यापैकी एकही आज पुण्यातल्या समाजात अशा मान्यतेने राहत नाही. म्हस्के साहेब त्यावेळी कसे राहू शकले ही मननीय गोष्ट आहे."

विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हस्केंचे केलेले अचूक मूल्यमापन आणि गंगारामभाऊंच्या सर्वसमावेशक मान्यतेसंदर्भातील नोंदवलेले वरील निरीक्षण महत्त्वाचे आहे. कारण हे निरीक्षण गंगारामभाऊंच्या ऐतिहासिक स्थानाचे समाजशास्त्रीय मूल्यमापन करते. गंगारामभाऊंचे त्या कालखंडातील सामाजिक आणि राजकीय जीवनातील वजन अधोरेखित करणारी आणखी एक नोंद महत्त्वाची ठरेल. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस या अखिल भारतीय स्तरावरील सर्वात महत्त्वाच्या संस्थेचे ते संस्थापक सदस्य होते.

## शाहू महाराजांना साहाय्य

राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्रातील समाजसुधारणेचे कार्य सर्वपरिचित आहे. परंतु त्यांच्या या कामात सयाजीराव गायकवाडांपासून अनेक महापुरुषांनी नेमके कोणते साहाय्य केले होते याबाबत संशोधन झालेले नाही. इतिहासाचे हे 'मौन' शाहू महाराजांच्या मूल्यमापनातील फार मोठी मर्यादा आहे आणि महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातील अपूर्णतासुद्धा आहे. कोणताही महापुरुष अतिशय चिवट अशा प्रस्थापित व्यवस्थेशी जेव्हा संघर्ष करत असतो तेव्हा त्याला अनेक ज्ञात-अज्ञात 'आधार' लाभलेले असतात. जेव्हा इतिहास अशा आधारांबद्दल अबोल असतो तेव्हा तो इतिहास वास्तवापासून दूर गेलेला असतो. शाहू महाराजांनी केलेल्या समता संघर्षात 'ढाल' आणि 'तलवारीची' भूमिका पार पाडणारे महत्त्वाचे लोक गंगारामभाऊंनी तयार केलेले होते.

राजर्षी शाहू महाराजांचा म्हस्केंशी पत्रव्यवहार होता. वसतिगृह, शिक्षण आणि संस्थानी प्रशासनासाठी शिकलेले लोक मिळवण्यासाठी हा पत्रव्यवहार होत होता. १८९४-९५ च्या दरम्यान शाहू महाराजांनी म्हस्केंना बहुजन समाजातील पदवीधर विद्यार्थ्यांची नावे मागितली होती. यासंदर्भात डॉ.रमेश जाधव म्हणतात, 'राज्यकारभारात समाजातील सर्व घटकांचा समावेश करून घेण्याचा शाहू छत्रपतींचा निर्धार कायम होता. ते धोरण त्यांनी आयुष्यभर अमलात आणण्याचे जीवापाड प्रयत्न केले.

हेच धोरण मनात ठेवून त्यांनी पुण्यातील एक नामवंत वकील आणि ब्राह्मेतर समाजाचे नेते गंगारामभाऊ म्हस्के यांना बहुजन समाजातील पदवीधर आणि नोकरीस पात्र अशा लोकांची नावे कळविण्यास विनंती केली.

गंगारामभाऊ म्हस्के यांनी १८८३ मध्ये डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून या संस्थेमार्फत अनेक गरीब आणि होतकरू अशा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली होती. त्यांनी दाजीराव अमृतराव विचारे आणि भास्करराव विठ्ठलराव जाधव या दोन होतकरू तरुणांची नावे शाहू छत्रपतींना कळविली.' पुढे शाहू महाराजांनी भास्करराव जाधवांची ८ जून १८९५ रोजी असिस्टंट सरसुभे म्हणून कोल्हापूर संस्थानात नेमणूक केली. पुढे २७ वर्ष भास्करराव जाधवांनी कोल्हापूर संस्थानात महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. शाहू महाराजांनी दाजीराव विचारे यांनाही बांधकाम विभागाचे प्रमुख केले. या उदाहरणावरून १८८५ पासून सयाजीरावांनी या संस्थेला दिलेला राजाश्रय महाराष्ट्राला किती उपकारक ठरला हे सूचित होते.

## गंगारामभाऊंच्या कामाची ऐतिहासिकता

गंगारामभाऊ म्हस्के हे नाव महाराष्ट्रातील सामान्य'लोकांना माहीतसुद्धा नाही याबद्दल आश्चर्य वाटण्याचा प्रश्नच नाही. कारण इतिहास आणि सामाजिक संशोधकांनासुद्धा 'कोण हे गंगारामभाऊ ?' असा धक्कादायक प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या कामाची ऐतिहासिकता शोधणे

किती आव्हानात्मक असेल याची कल्पनाच केलेली बरी. तावडेंनी केलेले या ऐतिहासिक अज्ञानाचे 'पोस्टमार्टेम' अत्यंत मार्मिक आहे. तावडेंचे विश्लेषण आपल्याला आत्मटीकेकडे घेऊन जाईल.

शिक्षणतज्ज्ञ सीताराम तावडे यांनी १९३५ मध्ये डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त प्रकाशित ग्रंथात व्यक्त केलेली खंत आणि मराठा समाजाची आपल्या इतिहासाबद्दलची अनास्था आपल्याला आत्मटीकेकडे घेऊन जाते. तावडे लिहितात, 'मराठा समाजाच्या उन्नतीसाठी डोंगराएवढे काम केलेल्या गंगारामभाऊ म्हस्के हे मराठा समाजाचे एक आद्य नेते ठरतात; पण बहुजन समाजासाठी काम करणाऱ्या मंडळीची ओळख पुढील पिढीस नीटशी होऊ शकली नाही, हाही इतिहास आहे. गंगारामभाऊ एक कर्मवीर होते. पुणेकर अनेक माणसांचा इतिहास सांगितला जातोय. तो सांगितलाच पाहिजे; पण त्यांनी फक्त स्वत:-पलीकडची गुंतवणूक म्हणून समाजाच्या उत्कर्षासाठी आयुष्य झोकून दिले, त्यांचे छोटे चरित्रही एवढ्या काळात उपलब्ध होऊ नये, ही बहुजन कर्मवीरांची खरी परवड आहे. त्यात गंगारामभाऊ लेखक नव्हते, बोलघेवडे वक्ते नव्हते, त्यामुळे त्यांचे बोलणे विचारही आज समाजासमोर आले नाहीत. मराठा समाजाच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी पुढे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद ही संस्था उदयास आली; पण तत्पूर्वी

गंगारामभाऊ हे जग सोडून निघून गेले होते. मराठा समाजात आज जी शैक्षणिक जागृती दिसत आहे, त्याचे मोठे श्रेय गंगारामभाऊ म्हस्के व त्यांचे आश्रयदाते महाराजा सयाजीराव गायकवाड यांना आहे. महाराष्ट्रात आज संख्येने मोठा असलेल्या मराठा समाजाच्या या नेत्याबद्दल, संस्थेबद्दल आज आमची अनास्था ही कृतघ्नतेचे आणि अनास्थेचे उदाहरण अस्वस्थ करणारे आहे.'

तावडेंचे वरील निरीक्षण फार महत्त्वाचे आहे कारण मराठा जातीतील अनेक कर्तबगार युगपुरुषांबाबत हे निरीक्षण लागू होते. मराठ्यांनी गंगारामभाऊंप्रमाणेच सयाजीराव गायकवाड, खासेराव जाधव, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याबाबतही असेच दुर्लक्ष केले आहे. मराठ्यांच्या उन्नतीसाठी सयाजीरावांनी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, बडोद्याचा मराठा फंड, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद या संस्थांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये मराठ्यांच्या शिक्षणासाठी खर्च केले.

खासेराव जाधवांनी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे काम अतिशय तळमळीने उभे केले. डॉ. पंजाबराव देशमुख घटना समितीचे सदस्य होते. त्यांनी ओ.बी.सी. जातींच्या आरक्षणासाठी आग्रह धरला. विशेष म्हणजे मराठा कुणबी जातीचा समावेश ओ.बी.सी. मध्ये केला. महाराष्ट्रभर सभा घेऊन मराठ्यांना तुम्ही कुणबी आहात त्यामुळे तुम्ही तुमच्या जातीच्या नोंदी कुणबी म्हणून करा असे त्यांनी महाराष्ट्राला १९५० च्या

दशकात सांगितले. ज्या मराठ्यांनी आपल्या नोंदी कुणबी अशा केल्या त्यांना ओ.बी.सी. आरक्षणाचा फायदा झाला. मराठ्यांचे इतिहासाबद्दलचे हे अज्ञान गंगारामभाऊंचे काम अलक्षित राहण्यास कारणीभूत ठरले.

महापुरुष स्वतंत्रपणे अभ्यासण्याच्या आपल्या परंपरेमुळे आपले किती नुकसान होते याचे आत्मपरीक्षण करण्यासाठी तावडेंचे वरील चिंतन फारच उपकारक ठरेल. कारण डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या कार्याचा इतिहास महाराष्ट्राबाहेर बडोद्यात गेल्याशिवाय आपल्याला कळत नाही. १८८५ ला सयाजीरावांनी म्हस्केंना आर्थिक मदत सुरू केली. त्यानंतर लगेच जानेवारी १८८६ ला खासेरावांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणाले होते की, या मदतीने आमचे हेतू पूर्ण होण्यास फायदा होईल. आज १४४ वर्षांनंतर आपण जेव्हा महाराजांच्या या पत्राचे वाचन करतो तेव्हा महाराजांचा तो निर्णय किती क्रांतिकारक होता याचा साक्षात्कार होतो.

गंगारामभाऊंच्या नेतृत्वाने महाराष्ट्रातील मराठ्यांच्या शैक्षणिक क्रांतीचा 'पाया' घातला. या पायातील 'दगड माती' बडोद्यातून आली होती. हा इतिहास महाराष्ट्रातील बहुजनांमध्ये 'चैतन्याचे झरे' फुलवेल असा आहे. डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन, बडोद्यातील मराठा फंड आणि अखिल भारतीय शिक्षण परिषद या तीन संस्थांच्या माध्यमातून सयाजीरावांनी मराठ्यांच्या शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च केले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १०० ते १५० कोटींच्या घरात जाईल.

१९३६ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड हे पुण्याच्या दौऱ्यावर होते त्यावेळी महाराष्ट्रातील ७४ संस्थांनी एकत्र येऊन महाराजांचा सत्कार केला होता. मुळात एवढ्या संस्थांनी पुण्यासारख्या ठिकाणी एकत्र येऊन 'बडोद्याच्या' महाराजांचा सत्कार का केला असेल याचा शोध घेणे म्हणजे महाराष्ट्राचा इतिहास पुन्हा लिहिणे आहे. याच सार्वजनिक सत्कारात महाराजांच्या आर्थिक पाठबळाने १८८३ पासून कार्यरत असलेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनने महाराजांना ३ जानेवारी १९३६ ला जे मानपत्र दिले त्या मानपत्रात सयाजीरावांचे मराठे आणि महाराष्ट्र यांच्या उत्कर्षात काय योगदान आहे ते जाणून घेणे गरजेचे आहे.

हे मानपत्र म्हणते, 'महाराजसाहेबांनी केवळ आपल्याच राज्यातील प्रजेच्या उन्नतिप्रीत्यर्थ प्रयत्न केले नसून राज्याबाहेरही सक्रिय सहानुभूती दाखविली आहे. महाराष्ट्रातील ज्या अनेक संस्थांना महाराजसाहेबांनी मदत केली आहे, त्यापैकी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन ही एक होय. या संस्थेस महाराजांनी सन १८८६ सालापासून मदत केलेली आहे व याच मदतीवर आतापर्यंत या संस्थेने मराठा समाजांत शिक्षणप्रसाराचे काम केले आहे. या संस्थेची मदत घेऊन पुष्कळ मराठा गृहस्थ नावारूपास येऊन आज मोठमोठ्या हुद्यांवर कामे करीत आहेत. महाराजसाहेबांनी मराठा समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी दिलेल्या या उत्तेजनामुळे त्या त्या व्यक्तींचाच उत्कर्ष झाला असे

नसून सर्व मराठा समाजाचा अप्रत्यक्षरीत्या उत्कर्ष झालेला आहे. अशा रीतीने महाराजांनी मराठा समाजाला चिरकाल उपकारबद्ध करून ठेवले आहे. याची फेड आमच्या समाजाच्या यापुढील कार्यक्षमतेनेच होणार आहे.'

गंगारामभाऊंच्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनचे आणखी एक ऐतिहासिक योगदान म्हणजे पुढे १९०७ मध्ये स्थापन झालेल्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या कामाची प्रेरणा गंगारामभाऊ म्हस्के हेच होते. कारण गंगारामभाऊंच्या कामाने मराठ्यांच्या शैक्षणिक विकासाला पहिल्यांदा संस्थात्मक स्वरूप आले. त्याचप्रमाणे गंगारामभाऊंमुळे या कामाची गरज अधोरेखित झाली.

## गंगारामभाऊंचे स्मारक

भारत हा स्मारकांचा देश आहे. भारतातील पुतळे आणि मंदिरे याची मोजणी झाली तर याबाबत भारत पहिल्या क्रमांकावर येईल अशी परिस्थिती आहे. आजही हे दोन मुद्दे भारतात राजकारणाच्या केंद्रस्थानी आहेत. याबाबत तर्क, इतिहास, बौद्धिक प्रेरणा यापेक्षा स्वजात, स्वधर्म अशा भावनिक मुद्याभोवती आपली स्मारके आकार घेत असतात. त्यामुळेच ती प्रेरणास्थाने न होता इतरांचा द्वेष करायला शिकवणारी प्रशिक्षण केंद्रे झाली आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर ज्या मराठ्यांचा प्रभाव आहे त्या मराठ्यांच्या महानायकाच्या स्मारकाचा विषय सर्वप्रथम १९३२ मध्ये चर्चेत आला. गेल्या ८८

वर्षात याबाबत काहीही झाले नाही. हे स्मारक योग्यवेळी झाले असते तर मराठ्यांचा बौद्धिक इतिहास फारच उंचावला असता.

कोल्हापूरचे पांडुरंग चिमाजी पाटील (पी.सी.) हे डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या शिष्यवृत्तीवर कृषी पदवीधर झाले. पुण्याच्या कृषी महाविद्यालयाचे ते पहिले भारतीय प्राचार्य होते. १९१६ ते १९२१ या कालावधीत ते डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनचे सचिव तर १९२३ ते १९५३ या काळात अध्यक्ष होते. ते अध्यक्ष असताना १९३२ मध्ये त्यांनी गंगारामभाऊंचे स्मारक उभारण्यासाठी दोन वर्षे सातत्याने आणि स्वखर्चाने प्रयत्न केले. संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांकडून निधी संकलनाचा प्रयत्न केला. हा गंगारामभाऊंच्या स्मारकाचा पहिला प्रयत्न होता. परंतु दुर्दैवाने हा प्रयत्न पूर्णत्वास गेला नाही.

मराठ्यांचे उद्धारकर्ते म्हणून महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर थेट राजर्षी शाहू महाराजांकडे जातो. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनंतर महाराजा सयाजीराव गायकवाड, खासेराव जाधव यांनी मराठ्यांच्या शैक्षणिक उत्कर्षाचा पायाभूत प्रयत्न अतिशय विचारपूर्वक घातला होता. या दोघांच्या प्रयत्नाशी सुसंगत काम गंगारामभाऊ म्हस्केंनी महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या भक्कम आर्थिक सहकार्याने १३५ वर्षांपूर्वी सुरू केले होते. मराठ्यांच्या दारिद्र्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते या वास्तवाला भिडण्याची दूरदृष्टी गंगारामभाऊंनी त्यावेळी दाखवली नसती तर आज मराठ्यांमध्ये जी शैक्षणिक

प्रगती दिसते तीसुद्धा दिसली नसती. त्यामुळे या महानायकाचे पुतळा नव्हे तर कृतिशील आणि वैचारिक स्मारक त्यांची कर्मभूमी असणाऱ्या पुण्यामध्ये साकारण्यासाठीसुद्धा मराठा आरक्षण आंदोलनाने पुढाकार घ्यावा अशी विनंती शेवटी करावीशी वाटते.

●●●

# सयाजीराव गायकवाड आणि गंगारामभाऊ म्हस्के यांच्यामार्फत डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या शिष्यवृत्तीचे काही कर्तबगार लाभार्थी (यादी अपूर्ण)

१. डॉ.लक्ष्मणराव गणपतराव माने - बडोद्यास मानकरी व खासगी खात्यात कामदार.

२. दाजीराव अमृतराव विचारे - कोल्हापूर संस्थानात एक्झिक्युटिव्ह इंजिनियर.

३. रामचंद्र नारायणराव जाधव - बडोद्याचे चीफ मेडिकल ऑफिसर, सयाजीरावांनी 'राजरत्न' पदवी दिली.

४. धर्माजीराव माधवराव रोकडे - त्यांच्या शाळेत मराठा समाजाच्या उन्नतीसाठी मोफत शिक्षण सुरु केले.

५. बाळकृष्ण विठोजी खोरे - मुंबईच्या गव्हर्नरचे ए.डी.सी.

६. मल्हारराव गोपाळराव साळुंखे - बडोदा संस्थानात नोकरी, सयाजीरावांनी उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवले.

७. गोविंदराव बाबाजी पवार - मुंबई कायदे कौन्सिल सदस्य, श्रीशिवाजी मराठा सोसायटी पुणेचे व्हा.पेट्रन

८. नारायणराव बचाजी शिंदे - मुंबई सेक्रेटरिएटमध्ये नोकरी

९. महादेवराव देवजीराव राणे - मुंबई सरकारमध्ये नोकरी, सर्व मिळकत समाजाच्या शिक्षणासाठी खर्च.

१०. कृष्णाजी विठ्ठलराव शिंदे - कोल्हापूर व अक्कलकोट संस्थानात पोलीस अंमलदार

११. रामचंद्रराव जनार्दन सावंत - बडोदा संस्थानात अकाऊंटंट जनरल

१२. यशवंतराव कृष्णराव दिलवर - कोल्हापूर संस्थानात सरसुभे

१३. विठ्ठलराव गोविंदराव माने - बडोदा संस्थानातर्फे इंग्लंडमधून बी.ए., बडोदा संस्थानात नायब सुभे

१४. वासुदेवराव लिंगोजीराव बिर्जे - सयाजीराव गायकवाडांच्या राजमहालाचे लायब्रेरियन

१५. भास्करराव विठोजीराव जाधव - कोल्हापूर संस्थानात नायब सुभे

१६. जिवाजीराव रागोजी सावंत - शाहू महाराजांच्या मराठा बोर्डिंगच्या स्थापनेत महत्वाचा सहभाग

१७. महादेवराव गोविंदराव पवार - बडोद्यात पोलीस सुपरीटेंडंट

१८. मारुतीराव तुकाराम कामटे - ब्रिटीश लष्करात डे. सुपरीटेंडंट ऑफ पोलीस, मराठ्यांच्या शिक्षणाला मदत

१९. नानाजी यशवंतराव कदम - बडोदा संस्थानात मुनसफ

२०. आबाजी जोतीराम मोहिते - कोल्हापुर संस्थानात सरसुभे

२१. खंडेराव गोपाळराव बागल - कोल्हापूर संस्थानातील पहिले मराठा वकील, कोल्हापूर संस्थानात न्यायाधीश

२२. यशवंतराव भगवंतराव मोहिते - बडोदा संस्थानात शेतकी व अबकारी खात्यात सुपरीटेंडंट

२३. बॅ. जिजाबा बजाराम मोहिते - बडोदा संस्थानात खासगी कारभारी

२४. रामचंद्र नारायण जाधव - प्रथम बडोदा व नंतर कोल्हापूर संस्थानात नोकरी

२५. कृष्णाजी धोंडजी काळे - मुंबई सरकारच्या रजिस्ट्रेशन विभागात नोकरी

२६. विठ्ठल रामजी शिंदे - अस्पृश्य उद्धार आणि प्रार्थना समाजाचे कार्य

२७. तुकोजीराव आप्पाजीराव चव्हाण - बडोदा संस्थानच्या लष्करात मेजर कमांडिंग पदावर काम

२८. गोविंदराव नानासाहेब ससाणे - कोल्हापूर संस्थानात शाळा खात्यात हेडमास्टर

२९. पांडुरंग बळवंतराव भोसले - सुरुवातीला कोल्हापूर संस्थानात मामलेदार, नंतर ग्वाल्हेर व देवास संस्थानात

३०. यशवंतराव गोविंदराव सावंत - डे. मराठा ए. असोसिएशन व श्री शिवाजी मराठा सोसायटीचे सभासद

३१. राजाराम सातोबा परब - बडोदा लष्करात लेफ्टनंट

३२. डॉ. बळवंत रावजी पाटील - कोल्हापूर संस्थानात सब असि. सर्जन

३३. गणपतराव रावजी मंडलिक - कोल्हापूर संस्थानात मामलेदार

३४. कृष्णाजी बळवंत सूर्यवंशी - मुधोळ संस्थानात अधिकारी

३५. गणपतराव कृष्णाजी कदम - कोल्हापूर संस्थानात वकील

३६. रामचंद्रराव आसवले - मराठा व मागास जातीतील मुलांसाठी मांडवीत मोफत शाळा

३७. गणपतराव भाऊराव तावडे - बडोदा संस्थानात डिस्ट्रीक्ट सेशन जज्ज

३८. जयराम जनार्दन सावंत - बडोदा संस्थानात एक्झिक्युटिव्ह इंजिनीअर

३९. रामचंद्रराव रावजी पवार - बडोदा संस्थानात अधिकारी, बडोदा संस्थानतर्फे अमेरिकेत उच्चशिक्षण

४०. नथाजी माणकु पवार - कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये पर्शियन भाषेचे शिक्षक

४१. पांडुरंग चिमाजी पाटील थोरात - डे. मराठा ए. असोसिएशनचे पाच वर्ष सचिव व तीस वर्ष अध्यक्ष

४२. गंगाजीराव मुकुंदराव काळभोर - ब्राह्मणेत्तर पक्षाचे पुढारी, अ. भा. मराठा शिक्षण परिषदेचे प्रमुख कार्यकर्ते

४३. विठ्ठलराव मार्तंड कराळे - ब्रिटीशांच्या सी.आय.डी. खात्यात इन्स्पेक्टर

४४. गोपाळराव दाजीराव नाईक - लोकप्रिय वकील, मराठा शिक्षण परिषदेचे सचिव म्हणून काम

४५. धोंडो विश्राम चव्हाण देशमुख - कोल्हापूर संस्थानात सिटी सर्व्हे ऑफिसर व ब्रिटीश प्रशासनात डे.कलेक्टर

४६. लक्ष्मणराव भाऊराव खैरे - बडोदा संस्थानात नोकरी

४७. रामचंद्रराव सावळाराम काटे - मुंबई पोलिसात सहा. पोलीस उपनिरीक्षक

४८. सीताराम बाळाजी शिंदे - मुंबई पोलिसात पोलीस निरीक्षक

४९. गोविंदराव नानाजी पिसाळ - कोल्हापूर संस्थानात रेसिडेन्सीच्या पोलिटीकल खात्यात नोकरी

५०. श्रीधर रामचंद्र बागवे - मुंबई सरकारमध्ये नोकरी

५१. आबाजी रावाजी निकम - ॲग्रीकल्चर खात्यात ओव्हरसियर

५२. रामचंद्र बळवंत चव्हाण देशमुख - बडोदा संस्थान पोलीसमध्ये इन्स्पेक्टर

५३. गोपाळ लिंगोजी बिरजे पाटील - बडोदा संस्थानात न्यायाधीश

५४. रामचंद्र परशराम निकम - कोल्हापूर संस्थानात नोकरी

५५. रावसाहेब दाजी देशमुख - बडोदा संस्थानात नोकरी

५६. आत्माराम कृष्णाजी सरनाईक - सुपरवायझर, जिल्हा लोकल बोर्ड, नगर

५७. बाळकृष्ण पिराजी जगताप - चीफ इंजिनियर, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर संस्थान

५८. केशव ठमाजी झांबरे पाटील - पोलीस इन्स्पेक्टर

५९. सटवाजी गुंडोजी मुटकेकर - डे. डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर

६०. दत्तात्रय रामचंद्र भोसले - श्री उदाजी मराठा बोर्डिंगचे संस्थापक

६१. गोविंद बाबजी संकपाळ - सातारा मराठा विद्याप्रसारक समाजाचे सेक्रेटरी

६२. हरी रामचंद्र बागवे - धुळे येथे गव्हर्नमेंट हायस्कूल मध्ये शिक्षक

६३. रामचंद्र चिमाजी येळवंडे - धार, मुधोळ, देवास ज्युनियर संस्थानात नोकरी

६४. रामचंद्र दौलत पाटील - साताऱ्यास इन्स्पेक्टर

६५. के.एम.पवार - ॲग्रीकल्चर कॉलेज पुणे येथे असि. प्रोफेसर, ॲग्री. डायरेक्टर म्हणून काम

६६. श्रीपतराव भाऊसाहेब जाधव - डिव्हिजनल सुपरीटेंडंट ऑफ ॲग्रीकल्चर, डेक्कन कॅनॉल बारामती

६७. रामचंद्र बापूराव शिंदे - सातारा जिल्हा ब्राह्मणेत्तर कॉंग्रेसचे सेक्रेटरी

६८. हणमंत मेघ:शाम देशमुख - बेरार मराठा एज्युकेशन असोसिएशनचे सेक्रेटरी

६९. नारायण तुकाराम जगताप - डिप्रेस्स्ड क्लासेस मिशन हुबळीचे ऑडीटर, मराठा समाज शिक्षणाचे कार्य

७०. डॉ. लक्ष्मण सबुजी साळुंखे - बडोदा संस्थानात मेडिकल विभागात नोकरी

७१. नारायण भाऊराव कर्णेकर - सोलापूर येथे वकिली व सामाजिक कार्य

७२. आत्माराम बापुजीराव विचारे - मुंबई येथे सब इन्स्पेक्टर

७३. गोविंद बाबाजी कोवली - कर्नाटक मध्ये बसवेश्वर हायस्कूलचे प्रिन्सिपॉल

७४. लक्ष्मण सावळाराम काटे - इंदोर संस्थानच्या न्याय खात्यात डि. जज्ज

७५. दौलतराम रामचंद्र महाडिक - कोल्हापूर संस्थानात इंजिनिअरींग खात्यात नोकरी

७६. रामचंद्र सदाशिव परब - बडोदा लष्करात कॅप्टन

७७ राजाराम गोविंदराव शिंदे - कोल्हापूर संस्थानात शिक्षणाअधिकारी

७८. रामचंद्र लक्ष्मण मोरे - वऱ्हाड प्रांतात नायब तहसीलदार

७९. रामचंद्र शामराव माने पाटील - बडोदा संस्थानचे अधिकारी, डे. मराठा ए. असोसिएशनचे सचिव व अध्यक्ष

८०. सोपान नामाजी कुऱ्हाडे - सोलापूर जिल्हा लो. बोर्डाचे मुख्याधिकारी, बार्शीचे मामलेदार

८१. शिवराम सखाराम शिर्के - पूर्व खानदेश लोकल बोर्डाचे प्रशासन अधिकारी

८२. अनंत शिवाजीराव चव्हाण - मराठा शिक्षण परिषदेच्या व्यवस्थापन व शिष्यवृत्ती समितीचे सदस्य

८३. जगन्नाथ शिवराम राणे - मुंबई प्रांत सी.आय.डी चे इन्स्पेक्टर

८४. वामन गोविंद तोडमल - नगर जिल्हा स्कूल बोर्डाचे सुपरवायझर

८५. सदाशिव लक्ष्मण बेनाडीकर - शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या क्षात्रजगद्गुरुपीठाचे पहिले जगद्गुरू

८६. पांडुरंग गोपाळराव साटम - मुंबईत पोलीस सब इन्स्पेक्टर

८७. भीमराव बळवंत माळवे - नगर जिल्हा लोकल बोर्डाचे मुख्याधिकारी

८८. रामचंद्र बळवंत निंबाळकर - ॲग्रीकल्चर खात्यात ओव्हरसियर

८९. सुबराव बसवंत गायकवाड - कागल (सिनियर) संस्थानचे कारभारी

९०. भुजंग केशव दळवी - मुंबई कायदे कौन्सिलचे बेळगाव जिल्हा प्रतिनिधी

९१. आबासाहेब बाळासाहेब मोहिते - बडोदा संस्थानात बडोदे प्रांत नायब सुभे

९२. गोविंद शिवाजी मोरे - सातारा येथे होम इन्स्पेक्टर

९३. कृष्णाजी बाबाजी घाटगे - निपाणी येथे वकिली, काही काल राष्ट्रवीर पत्राचे संपादक

९४. डॉ. शंकर गणपत चव्हाण - वॉर हॉस्पिटल खांडवा येथे नोकरी

९५. दादोजी महादेव पवार - बडोदा संस्थानात रिव्हेन्यू खात्यात नोकरी

९६. कृष्णाजी राघूजी घाटगे - श्री सयाजी मराठा बोर्डिंग हाऊस कमिटी, लष्कर ग्वाल्हेरचे अध्यक्ष

९७. रामचंद्र शिवाजी सुर्वे - राजाराम हायस्कूल व बी.टी. कॉलेज कोल्हापूर येथे शिक्षण

९८. सीताराम रामजी तावडे - पुणे ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन चे प्राचार्य, डे. मराठा ए. असोसिएशनचे सचिव

९९. नारायण तुकाराम भोसले - पोलीस सब इन्स्पेक्टर

१००. बापूसाहेब नागोजी सरदेसाई - कोल्हापूर संस्थानात हुजूर ट्रेझरी ऑफिसर व दफ्तरदार

१०१. बाबुराव सखाराम नलवडे - पोलीस सब इन्स्पेक्टर

१०२. गोविंद बापुजी शिंदे - मामलेदार

१०३. बाळकृष्ण गणपत सावंत - बडोदा संस्थानात खासगी खात्यात चिटणीस

१०४. बाळकृष्ण गोपाळ विचारे - मुंबई सचिवालयात नोकरी

१०५. लक्ष्मण देवजी सुर्वे - चिमणाबाई हायस्कूल बडोदा येथे शिक्षण

१०६. नारायण कृष्णराव भोसले - ग्वाल्हेर संस्थानात एक्झिक्युटिव्ह इंजिनीअर

१०७. रामचंद्र धर्माजी शिंदे - नाशिक येथे वकिली व ब्राह्मणेत्तर पक्षाचे कार्य

१०८. फत्तेसिंग सदाशिव काळे - बडोदा संस्थानात खानगी खात्यात नोकरी

१०९. अंबादास रघुनाथ परब - महाराष्ट्र हितचिंतक भ्रातृ मंडळ संस्थेची स्थापना

११०. रामचंद्र कोंडीबा अनपट - सातारा व जळगाव विद्या प्रसारक समाज या संस्थांना मोठी आर्थिक मदत

१११. पुतळाबाई पवार - नाशिक ए.व्ही.गव्हर्नमेंट हायस्कूलमध्ये हेडमिस्ट्रेस

११२. नारायण रावजी तावडे - बडोदा संस्थानात खाजगी खात्यात नोकरी

११३. जयवंत घनश्याम मोरे - मुंबई कायदे कौन्सिलवर सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी

११४. माधव धनाजी सणगे - भारत सरकारच्या गृह विभागात सचिव

११५. सीताराम रावजी मोहिते - कोल्हापूर संस्थानात पन्हाळा येथे मामलेदार

११६. महादेव तुकाराम भिलारे - मुंबई येथे मिलिटरी अकाऊंट्स विभागात नोकरी

११७. शामराव संताजी भोसले - कोल्हापूर संस्थानात हायकोर्ट न्यायाधीश

११८. रामचंद्र सदाशिव सूर्यवंशी - कोल्हापूर संस्थानात शेती इन्स्पेक्टर

११९. नारायण केशव ढमढेरे - मामलेदार

१२०. बाबाजी लक्ष्मण पाटील - कोल्हापूर संस्थानात मामलेदार

१२१. बळवंतराव मिनाजी कांग्रळकर - कोल्हापूर संस्थानात अधिकारी

१२२. कृष्णराव आनंदराव पवार - सब रजिस्टार

१२३. रामराव जोतीराव शिंदे - देवास येथील मार्तंड विजय पत्राचे संपादक व मराठा शिक्षण परिषदेचे प्रचारक

१२४. दत्तात्रय बंडोबा भोसले - कोल्हापूर संस्थानातील शुगर फॅक्टरीत नोकरी

१२५. हणमंत परशुराम सूर्यवंशी - धारवाड येथे शाहू छत्रपती मराठा बोर्डिंगच्या स्थापनेत सहभाग

१२६. दत्तात्रय हरी पवार - वकिली

१२७. पुरषोत्तम यशवंत फडतरे - मुधोळ संस्थानात नोकरी.

१२८. डॉ. नानासाहेब रामजी तावडे - विज्ञान संशोधक

१२९. विष्णू महादेव राणे - मुंबई महानगर शाळेत सुपरवायझर

१३०. दगडू बापुजी शिंदे - सिनियर देवास हायस्कूलमध्ये शिक्षण

१३१. शंकर बळवंत चव्हाण - उपजिल्हाधिकारी म्हणून नोकरी व ब्राह्मणेत्तर समाजाच्या हितासाठी कार्य

१३२. गणपत कृष्णाजी पाटील - कोल्हापूर संस्थानातील ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन चे प्राचार्य

१३३. बापूराव नाथाजी नलावडे - सातारा येथे वकिली, ब्राह्मणेत्तर पक्षाचे कार्य

१३४. सखाराम पांडुरंग सावंत - कोल्हापुरातील प्रसिद्ध वकील, कोल्हापूर महानगरपालिकेचे अध्यक्ष

१३५. गणपतराव रामराव यादव - ॲग्री ओव्हरसियर

१३६. डॉ.कृष्णाजी महादेव काळे - मेडिकल ऑफिसर, सत्यशोधक चळवळीचे प्रसारक

१३७. रामचंद्र सुबराव पाटील - ॲग्रीकल्चरल ऑर्गनायझर धारवाड

१३८. रामराव नागेश शिंदे - मुंबईतील चष्म्याचे प्रमुख व्यापारी

१३९. रामराव सुबानराव बर्गे - ग्वाल्हेर येथील श्रीसयाजी मराठा बोर्डींगचे अधिक्षक

१४०. रघुनाथ बापुजी घाटगे - ॲग्रीकल्चर खात्यात ओव्हरसियर

१४१. शंकरराव नारायणराव नलावडे - मुंबई महानगरपालिका दवाखान्यात डॉक्टर

१४२. विश्वास बळवंत साळुंखे - नगर लोकल बोर्डात इंजिनीअर

१४३. वामन सीताराम सावंत - वकिली व समाजकार्य

१४४. बॅ. रघुनाथ पांडुरंग सावंत - कोल्हापूर संस्थानात मुख्य न्यायाधीश

१४५. विनायक नीलकंठ देशमुख - वकील

१४६. मारुती यल्लाप्पा कडोलकर - प्रशासन अधिकारी म्युन्सिपल स्कूल बोर्ड निपाणी

१४७. डॉ. व्यंकटेश केशव नालिग्ये - बेंगलोर मेडिकल स्कूलमध्ये मराठा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप सुरु केली

१४८. कृष्णराव जोतीराव मोहिते - डे. मराठा ए. असोसिएशनचे सभासद व कार्यकर्ते

१४९. नीलकंठ काळोजी मिराशे - सुपरीटेंडंट ऑफ श्री शाहू बोर्डिंग धारवाड

१५०. हरी आबाजी येवले - शिक्षण, क्रीडा, संशोधन, लेखन यामध्ये भरीव योगदान

१५१. मार्तंडराव मल्हारराव लाड - वकिली व समाजकार्य

१५२. पुरुषोत्तम मुकुंदराव सोंडे - कोल्हापूर संस्थानच्या आरोग्य खात्यात नोकरी

१५३. विजय महादेव चव्हाण - प्रोफेसर ॲग्रीकल्चर कॉलेज पुणे

१५४. डॉ. तुकाराम गोपाळ शिरनामे - डे. मराठा ए. असो.चे सेक्रेटरी व श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणेमध्ये सक्रीय

१५५. यशवंतराव बापुजी शिंदे - सुपरवायझर स्कूल बोर्ड सातारा

१५६. बळवंतराव सगाजी डाबले - पोलीस सब इन्स्पेक्टर

१५७. वासुदेवराव गोविंदराव परब - रत्नागिरीत वकिली

१५८. प्रभाकर कोंडाजी भापकर - कोल्हापूर संस्थानच्या न्याय खात्यात नोकरी

१५९. रामचंद्रराव गुणाजी साळवी - रत्नागिरी जिल्हा मराठा संघाचे सेक्रेटरी

१६०. डॉ.शांताराम सीताराम सावंत - मुंबईत वैद्यकीय व्यवसाय

१६१. डॉ.बाळकृष्ण नारायण सावंत - रत्नागिरी वैद्यकीय व्यवसाय

१६२. रामचंद्रराव नारायण परब - कृषी पदवीधर

१६३. वामनराव दलपत साळुंखे - ॲग्रीकल्चरल ऑर्गनायझर

१६४. गोविंदराव आत्माराम कदम - कोल्हापूर संस्थानात मामलेदार

१६५. पांडुरंगराव कृष्णराव शिंदे - कराड येथे वकिली

१६६. नामदेवराव एकनाथराव नवले - ब्राह्मणेत्तर पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते, मुंबई कौन्सिलचे व्हा. प्रेसिडेंट

१६७. सावळाराम कृष्णाजी घोरपडे - मुख्याधिकारी, जळगाव जिल्हा लोकल बोर्ड

१६८. शंकरराव बळवंतराव चव्हाण - कोल्हापूर संस्थानात मामलेदार

१६९. बाबुराव रामचंद्रराव घोलप - जनरल सेक्रेटरी, श्री शिवाजी मराठा सोसायटी

१७०. दत्तात्रय नारायण शिर्के - बडोदा संस्थानात लेफ्टनंट

१७१. उत्तमराव अनंतराव कदम - कैवारी पत्राचे संपादक

१७२. नरहर गोपाळराव शिंदे - कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये संस्कृत व इंग्रजीचे प्राध्यापक

१७३. सदाशिव गुळाजी जाधव - मुंबई सचिवालयात अधीक्षक

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com